Impact Factor-7.675 (SJIF)
ISSN-2278-9308

# B.Aadhar


## Peer-Reviewed & Refreed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

**October-2021**

ISSUE No- (CCCXXV ) 325

## Indian Economy: Issues & Challenges (2014 to 2021)




**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
**Dr. Manjusha R. Thakre**
Organizing Secretary
Head, Dept. of Economics
Annasaheb Gundewar
College, Nagpur-13

**Annasaheb Gundewar College, Nagpur-13**

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | नोटबंदी : रोकडविरहित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल आणि सरकारसमोरील आव्हाने — नित्ता सखाराम खिराळे | 1 |
| 2 | वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) ही भारतीय कर प्रणालीची उत्क्रांती आहे — सावन किसन राठोड | 3 |
| 3 | भारतीय कृषी धोरणे व योजना — एक अभ्यास — प्रा.श्रीकृष्ण बी.बोढे | 6 |
| 4 | भारतीय कृषी कायदे व शेतीचा विकास -- एक मृगजळ — प्रा.पुरुषोत्तम रंगराव चाटे | 11 |
| 5 | लोकसंख्या वृद्धीचा भारताच्या आर्थिक विकासावर प्रभाव — डॉ. अश्विनी श्रीधर राऊत | 14 |
| 6 | Study of Poverty In India — Dr. J.M. Kakde | 24 |
| 7 | भारतीय अर्थव्यवस्थेच्या समस्या व प्रमुख आव्हाणे — डॉ. सुनिल शिंदे | 29 |
| 8 | महिला उद्योजकतेतून आत्मनिर्भर भारत — डॉ. रावसाहेब पिराजी इंगळे | 34 |
| 9 | भारतीय पायाभूत संरचना आणि आव्हाने — डॉ. विठ्ठल घिनमिने | 37 |
| 10 | अमर्त्य सेन यांचा जीवन परिचय व आर्थीक विचार — प्रा. डॉ. लोकचंद जाधव | 43 |
| 11 | 'कृषी विकासात प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेची भूमिका'(संदर्भ वर्धा जिल्हा) — प्रा. जगदीश वाटमोडे /डॉ. संजय धनवटे | 46 |
| 12 | वस्तू व सेवा कराचे उद्योग क्षेत्रावर परिणाम : एक आढावा — डॉ. मदन जी. प्रधान | 50 |
| 13 | नवीन कृषी कायदा : स्थिती व आव्हाने — डॉ. जयंतकुमार एम. मस्के | 53 |
| 14 | भारतातील आर्थिक विकासावर लोकसंख्या वाढीचा परिणाम — प्रतिक गोकुलदास ठाकरे | 56 |
| 15 | कोविड — 19 व भारतीय कृषी क्षेत्र — प्रा.डॉ. विनोद बागवाले | 61 |
| 16 | वस्तू व सेवा कराचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम : एक अभ्यास — डॉ. एस. पी. झांबरे | 67 |
| 17 | भारतीय अर्थव्यवस्था की चुनौति — डॉ. अजय नानाजी सरटकर | 70 |
| 18 | गरीवी और असमानता — डॉ. शमापरवीन सरफराज खान | 73 |
| 19 | 'ग्रामीण पर्यटन व्यवसाय से भारतीय ग्रामीण आर्थिक विकास —एक अध्ययन — प्रा.डॉ.ए.बी.पटले | 76 |

# भारतीय अर्थव्यवस्थेच्या समस्या व प्रमुख आव्हाणे

डॉ. सुनिल शिंदे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख शिवापूर महाविद्यालय, शिवापूर

- **प्रस्तावणा**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या वाटचालीचा विचार करता भारतासाठी केवळ समाजवादी अर्थव्यवस्थेचा किंवा भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा स्विकार करणे तत्कालीन परिस्थितीमध्ये शक्य नव्हते. स्वातंत्र्यानंतर भारताने १९४८ मध्ये भांडवलशाही आणि समाजवादी अर्थव्यवस्थांमधील गुणांचा सुवर्णमध्य साधून मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. भारतीय अर्थव्यवस्था ही केवळ समाजवादी स्वरूपाची किंवा केवळ भांडवलशाही स्वरूपाची नसून या दोन्ही अर्थव्यवस्थचे मिश्रण असलेली अर्थव्यवस्था असल्यामुळे अर्थशास्त्रज्ञ भारतीय अर्थव्यवस्थेचे वर्णन मिश्र अर्थव्यवस्था असे करतात. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये समाजवादी अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक क्षेत्र आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थतील खाजगी क्षेत्र अस्तित्वात असून सयुक्त क्षेत्रामध्ये सरकार आणि खाजगी क्षेत्राचे अस्तित्व मान्य केले आहे. भारताची अर्थव्यवस्था ही सार्वजनिक क्षेत्र, खाजगी खेत्र आणि सयुक्त क्षेत्र यांचा त्रिवेणीसंगम आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काही वर्षामध्ये मिश्र अर्थव्यवस्था असलेल्या भारताने समाजवादी अर्थव्यवस्था असलेला मार्ग स्विकारला होता. भारतामध्ये सुरवातीच्या काळात खाजगी क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेतील सहभागावर, आंतरराष्ट्रीय व्यापारावर आणि इतर विदेशी राष्ट्रांकडून भारतामध्ये होणाऱ्या प्रत्यक्ष गुंतवणूकीवर कडक बंधने होती. परंतु १९९१ च्या धोरणापासून भारतीय अर्थव्यवस्था भांडवलशाही अर्थव्यवस्थेकडे वळली. भारताने हळूहळू विदेशी गुंतवणूक आणि व्यापारावरील नियंत्रण कमी करून खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरू केली. वर्तमान स्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेचा कल हा वेगाने आर्थिक सुधारणाकडे असून कृषी उद्योग आणि सेवा क्षेत्रात सरकार अनेक सुधारणाविषयक विधेयक पारीत करीत आहे. भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी नुकतेच 'सरकारने व्यवसाय करू नये तर उद्योजकशिलतेला प्रोत्साहन दिले पाहिजे ' असे म्हटले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये वेगाने सार्वजनिक क्षेत्र कमी होत जावून खाजगी क्षेत्राचा विस्तार वेगाने होत जाणार आहे.

- **जागतिक अर्थव्यवस्थेत भारताचे स्थान**

२०१८ च्या जागतिक बँकेच्या क्रमवारीत-भारतीय अर्थव्यवस्था सहाव्या स्थानावरून सातव्या स्थानावर आलेली होती २०१७ च्या क्रमवारीत भारतीय अर्थव्यवस्था सहाव्या क्रमांकावर होती आणि अर्थव्यवस्थेचे आकारमान २.५६ ट्रिलियन डॉलर्स होते. २०१८ मध्ये अर्थव्यवस्थेचे आकारमान वाढून २.७३ ट्रिलियन डॉलर्स झाले परंतु अर्थव्यवस्था सहाव्या स्थानावरून घसरून सातव्या स्थानावर आली. याच काळात ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेने अधिक सक्षम होत भारतीय अर्थव्यवस्थेला सातव्या स्थानावर ढकलले. २०१८ मध्ये ब्रिटनची अर्थव्यवस्था २.८४ ट्रिलियन डॉलर्सवर पोहचली. फ्रान्सची अर्थव्यवस्था २.७८ डॉलर्सवर पोहचली. अमेरिकेची अर्थव्यवस्था २०.४९ ट्रिलियन डॉलर्ससह पहिल्या क्रमांकावर आहे. चीनची अर्थव्यवस्था १३.६१ डालर्ससह दुसऱ्या क्रमांकावर आहे. लोकसंख्या व आकारमानाने छोट्या असलेल्या जपानची अर्थव्यवस्था ४.९७ ट्रिलियन डॉलर्ससह तिसऱ्या क्रमांकावर आहे. कोरोना महामारीचा फटका भारतीय अर्थव्यवस्थेला बसल्यामुळे २०१९ मध्ये पाचव्या स्थानावर पोहचलेली अर्थव्यवस्थेची घसरण सहाव्या स्थानावर झालेली होती. मनीकंट्रोलने दिलेल्या वृत्तानुसार २०२० मध्ये भारतीय अर्थव्यवस्था सहाव्या स्थानावर आली असून २०२५ मध्ये ब्रिटनला मागे टाकून अर्थव्यवस्था पाचवे स्थानावर येईल आणि २०३० मध्ये अर्थव्यवस्था जगात तीसरे स्थान पटकावेल असे मत नोंदविले आहे. भारताचे मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२४ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्स पर्यंत पोहचेल असा आशावाद व्यक्त केला आहे.

- **जागतिक अर्थव्यवस्थेची सद्य स्थिती**

आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीने २०२०—२१ या वर्षाचा जागतिक आर्थिक वृध्दीदराचा अनुमान ३.६ टक्यावरून घटवून ३.२ टक्के इतका केला आहे यारून जागतिक मंदीची चाहुल कळते. सिंगापूर आणि दक्षिण कोरीया सारख्या जागतिक स्तरावरील मोठ्या निर्यातक देशांचा निर्यात वृध्दी दर नकारात्मक झाला आहे. चीनच्या वर्तमान आकडेवारीनुसार चीनचा दुसऱ्या तिमाहीतील वृध्दीदर ६.२ टक्यावर आलेला होता जो पहिल्या तिमाहीमध्ये ६.४ टक्के होता. १९९२ च्या नंतर प्रथमच चीनचा वृध्दीदर इतक्या खालच्या स्तरावर आलेला होता. जर्मनीच्या पहिल्या तिमाही आकडेवारीनुसार जर्मनीचा वास्तविक वृध्दीदर ०.९ टक्के कमी होवून ०.४ टक्यावर आलेला आहे. बॅंक ऑफ इंग्लंड च्या अनुसार ब्रिटन सुध्दा मंदिच्या उंबरठ्यवर आहे. तसेच अमेरिकी अर्थशास्त्रज्ञाच्या मते २०२०—२१ मध्ये अमेरीकेमध्ये सुध्दा मंदीचे वारे सुरू झाले असून जगातिल सर्वात मोठी अर्थव्यवस्थेची स्थिती जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्थितीसारखीच वाईट काळातून जात आहे.

- **भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक सर्वेक्षणातील निष्कर्श**

भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाने २०२०—२१ मध्ये दर्शविलेल्या आर्थिक सर्वेक्षणामध्ये २०२१—२२ मध्ये भारताचा वास्तविक जीडीपी ११ टक्के आणि सांकेतिक जीडीपी १५.४ टक्यांनी वाऐल असा आशादायक विश्वास व्यक्त केला आहे. आधी वर्तवलेल्या अंदाजानुसार लॉकडाउनमुळे पहिल्या तिमाहीत जीडीपीमध्ये (—) २३.९ टक्के इतकी मोठी घसरण नोंदली गेली होती. कमी होत जाणाऱ्या कोरोना संकटानतरच्या काळात अर्थव्यवस्थेतील निर्बंध कमी होत गेल्यामुळे उद्योग व सेवा सेवाक्षेत्रातील आर्थिक स्थिती वेगाने सुधारत आहे. अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील गुंतवणूक वाढत असून आत्मनिर्भर भारत अभियानाच्या माध्यमातून देण्यात येत असलेल्या आवश्यक सहाय्याच्या बळावर अर्थव्यवस्था अधिक मजबुतीने सुधारणेच्या मार्गावर पुढे वाटचाल करत आहे भारताचा वास्तविक जीडीपी वृद्धि दर आर्थिक वर्ष २०२१—२२ मध्ये ११.५ टक्के आणि २०२२—२३ मध्ये ६.८ टक्के राहील. आयएमएफने भारत पुढील दोन वर्षात सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था बनेल असा विश्वास व्यक्त केला आहे.

कोरोना संकटाच्या काळात लावण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे भारताला अनेक समस्यांना सामोरे जावे लागले या स्थितीत भारताने अत्यंत परिपक्वता दाखवून अर्थव्यवस्थेला मजबुत करण्याचे कार्य केले. कृषि क्षेत्र अजूनही आशेचा किरण आहे तर परस्पर संबंधांवर आधारित सेवा, निर्मिती आणि बांधकाम क्षेत्राला कोरोना संकटाचा सर्वाधिक फटका बसला असून आता या क्षेत्रामध्ये हळूहळू व सकारात्मक सुधारणा होत आहे. चालु वर्षात निर्मिती क्षेत्र व ग्रामीण भागात वाढ दिसून आली. औद्योगिक उत्पादनात सुधारणा दिसून आली. अधिकची जोखिम न स्विकारल्यामुळे कर्जाची मागणी घटली त्यामुळे कर्जात घट झाली.खाद्यपदार्थांच्यावाढलेल्या किमतीमुळे २०२० मध्ये महागाईचा दर चढा राहिला. मात्र डिसेंबर २०२० मध्ये महागाई दर रिझर्व्ह बॅंकेच्या ४+/—२ टक्क्यांच्या श्रेणीत घसरून ४..६ टक्के राहिला. बाह्य क्षेत्राने विकासाला आवश्यक पाठबळ दिले . वर्षाच्या पहिल्या सहामाहीत चालू खात्यात शिल्लक जीडीपीच्या अंदाजे ३.१टक्के होती. जीडीपीचे गुणोत्तर म्हणून बाह्य कर्ज सप्टेंबर २०२० च्या अखेरच्या तुलनेत २१.६ टक्क्यांपर्यत वाढले. मार्च २०२० च्या शेवटी ते २०.६ टक्के होते. मात्र परकीय चलन साठयाचे प्रमाण वाढल्यामुळे एकूण आणि अल्प—मुदतीच्या कर्जाच्या गुणोत्तरात (मूळ आणि अवशिष्ट) सुधारणा झाली.

- **भारतीय अर्थव्यवस्थेच्या समस्या**

कोणत्याही राष्ट्राचा आर्थिक विकासाची कल्पना त्या राष्ट्राचे राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पनवरून येते. विकसित देशाच्या तुलनेत भारताचे दरडोई उत्पन्न कमी असून भारताचा समावेश विकसनशिल देशामध्येच होतो. चालु आर्थिक वर्षात भारताच्या दरडोई उत्पन्नात ५.४ टक्याने घअ होण्याची शक्यता स्टेट बॅंकेच्या आर्थिक शाखेने व्यक्त केली आहे. एकूण देशांतर्गत उत्पादनातील (जीडीपी) सर्वसाधारणपणे होणाऱ्या ३.८ टक्याच्या घसरणीपेक्षा दरडोई उत्पन्नातील घट मोठी असेल. वितरणाच्या बाबतीत जगभरातच खुप असमानता आहे. उत्पन्न व संपत्तीच्या वितरणातील असमानता ही भारतीय अर्थव्यवस्थेचीसुध्दा एक मोठी समस्या आहे. 'ऑक्सफाम' आणि २०१९

ISSN : 2278-9308
October, 2021

घा नाईट फॅक' अहवालामध्ये जगभरातील देशांच्या संपत्तीच्या वितरणाची आकडेवारी प्रसिध्द केली. या अहवालाप्रमाणे भारतातील नऊ अब्जाधीशांकडे असलेली संपत्ती ही निम्या भारतीय लोकसंख्येच्या संपत्ती एवढी आहे. भारतात दहा टक्के लोकसंख्येच्या ताब्यात देशातील ७७.४ टक्के संपत्ती आहे. आणि त्यामध्ये दरवर्षी वाढच होत आहे. सरकारच्या धोरणांमुळे देशातील श्रीमंत– गरीब अंतर वाढतच जात आहे हे गरीबी नष्ठ करण्याच्या प्रयत्नांना सुरंग लावण्यासारखेच आहे. याचे समर्थन केले जाऊ शकत नाही.

भारतीय अर्थव्यवस्था अद्यापीही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. भारतामध्ये दोन तृतीअंश भारतीय शेतीवर अवलंबून आहेत. परंतु विकासाकरीता आर्थिक नियोजनाची कास धरतांना उद्योग व सेवा क्षेत्राच्या तुलनेत कृषी क्षेत्राकडे लक्ष दिले नाही त्यामुळे कृषी विकासाचा दर अत्यंत कमी राहिला. शेती भारतीय शेतकऱ्यांसाठी बेभरोशाच्या व्यवसाय झाला आहे. उत्पन्न व किंमतीतील अनिश्चितता, सततची नैसर्गिक आपत्ती, बाजारपेठेतील लुट, वाढता उत्पादन खच, कर्जबाजारीपणा ह्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी स्वत:चे जीवन संपविले आहे व संपवित आहे. २०११–२०१२ च्या आकडेवारीनुसार भारतात एकूण दारिद्र्येपेखालील लोकांचे प्रमाण २१.९ टक्के आहे. ग्रामीण भागात २५.७ टक्के तर शहरी भागात १३.७ टक्के आहे. चीननंतर लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. गेल्या पन्नास वर्षात भारताच्या लोकसंख्येत तीप्पट वाढझाली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी सरकारला

- **भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील प्रमुख आव्हाणे**

**१) गरीबी निर्मुलनाचे आव्हान:** संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवी विकास निर्देशांकाप्रमाणे गरीबीच्या बाबतीत भारत बरीच वर्ष निचांक पातळीवर आहे. २०१६ च्या मानवी विकास सुचकांक नुसार १८८ राष्ट्राच्या यादीत भारत १३१ व्या क्रमांकावर आहे. १९९१ पासून भारताने आर्थिक सुधारणांना गती देवून भारतामध्ये दारीद्र्य आणि गरीबी कमी करण्यासाठी अनेक योजना आणल्या तरी सुध्दा भारतामध्ये गरीबीचे प्रमाण पाहिजे तेवढे कमी झालेले नाही.

**२) भ्रष्टाचाराचे आव्हान :** जागतिक बॅंकेनुसार विकसनशिल देशांमध्ये भ्रष्टाचार मोठ्य प्रमाणात बोकाळलेला आहे. भारतही त्यास अपवाद नाही. भष्टाचारामुळे काळ्यापैशाला खतपाणी मिळते. भ्रष्टाचारामुळे कल्याणकारी कार्यावर विपरीत परीणाम होतो. लोकांना त्याचा फायदा मिळत नाही. कार्यक्रम व सरकारी धोरणांच्या नियोजन व अमंलबजावणीचा वेग मंदावतो. विदेशी गुतवणूकीपासून आपण वंचित राहतो. भ्रष्टाचारामुळे सर्वात जास्त नुकसान गरीब वर्गाचे होते. सरकारच्या कोणत्याही योजनेचा फायदा घेण्यासाठी या वर्गाला लाच दिल्याशिवाय तो मिळत नाही.

**३) बेरोजगारीचे आव्हान :** बेरोजगारी हा भारतीय अर्थव्यवस्थेला लागलेला शाप आहे. लोकसंख्या वाढीमुळे आणि रोजगार निर्मितीच्या कमी दरामुळे भारतामध्ये बेरोजगारीचे मोठे आव्हाण आहे. देशात बेरोजगारीचा दर (६.१ टक्के) हा गेल्या ४५ वर्षातील सर्वाधिक असल्याचे सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे. यासाठी कौशल्य विकासावर आधारीत शिक्षणाची गरज आहे. यासाठी भारत सरकारने मेक इन इंडिया, कौशल्य विकास अभियान, स्टार्ट अप, स्टॅंड अप इंडिया आणि डिजीटल योजना सुरू केलेल्या आहेत. मेक इन इंडियाच्या माध्यमातून २०२२ पर्यंत १० कोटी रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे.

**४) रोजगारवाढीचे आव्हान :** मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी २०२४ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था पाच ट्रिलीयन डॉलर्सची करण्याचे उद्दिष्ठ नि?चत केले आहे. परंतु सद्याचा आर्थिक वाढीचा दर पाहता उद्दिष्ठापर्यंत पोहचणे कठिण वाटते. आर्थिक वाढीसोबतच नौकऱ्यांमध्ये वाढ होतांना दिसून येत नाही. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला 'जॉबलेस ग्रोथ' अर्थात रोजगारविरहीत वाढ म्हटले जाते.

**५) वाढत्या बाह्य कर्जाचे आव्हान:** जागतिक बॅंकेच्या आंतरराष्ट्रीय कर्जाविषयीच्या २००७ च्या आकडेवारीमध्ये विकसनशिल देशांच्या बाह्य कर्जाची आकडेवारी दिलेली आहे. या आकडेवारीनुसार भारताच्या बाह्य कर्जाच्या साठयाचे देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी २४.४ टक्के आहे.

६) पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे आव्हान : पायाभूत सुविधा कोणत्याही देशाच्या देशाच्या विकासाचे आधारस्तंभ असतात. मागील ७० वर्षात या सुविधांच्या विकासाकडे पाहिजे तेवढे लक्ष

पुरविण्यात आले नाही. परंतु गेल्या तीन वर्षात रेल्वे, रस्ते, बंदर, नौकानयन, हवाई वाहतुक, देशांतर्गत जलवाहतुक, उर्जा, दळणवळणाची साधने यांच्या वाढीवर भर दिला आहे. मुलभूत पायाभूत सुविधांच्या अभावी कृषीक्षेत्रालाही रस्ते, सिंचन, शितगृहे यामुळे फटका बसला आहे. त्यामुळे सरकारने आधुनिकीकरणाची कास धरून स्किल इंडिया, डिजीटल इंडिया आणि मेक इन इंडियाच्या माध्यमातून भारतामध्ये जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जात आहे.

**६) शेतकरी आत्महत्येचे आव्हान** :कर्जाचा डोंगर, गरीबी, अचानक आलेली संकटे, दारीद्र या परिस्थितीतून मार्ग न निघाल्याने गेल्या १६ वर्षात तब्बल २ लाख ९० हजार ७४० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे वास्तव केंद्रीय कृषी राज्यमंत्री यांनी राज्यसभेत मांडले. कर्जमाफी, मदतीचे पॅकेज, व्याजदरात सवलत अशा सरकारी घोषणा वारंवार होऊनही शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी होत नसल्याने स्पष्ट झाले आहे. सरकारने शेती आणि शेतकऱ्यांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी कृषी सुधारणा विधेयके आणली परंतु हे विधेयक शेती आणि शेतकऱ्यांसाठी फायदेशिर नाही म्हणून शेतकरी संघटना एक वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून ही विधेयके रद्द करण्यासाठी आंदोलने करीत आहेत.

**७) विकासातील विषमतेचे आव्हाण** : विकासातील विषमता राज्याराज्यांमध्ये सुद्धा आहे. उच्च उत्पन्न असलेल्या अनेक विकसित राज्यांनी आपल्याकडील गरीबी कमी करण्यात यश मिळवले आहे. पण आसाम, बिहार, छत्तीसगढ, झारखंड, मध्य प्रदेश, ओरीसा, राजस्थान आणि उत्तर प्रदेश ही राज्ये विकासात मागे पडली आहेत.

- **उपसंहार**

अर्थव्यवस्थेमध्ये वाढत्या कोरोना संसर्ग कमी करून लोकांचा जीव सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने सरकारने २४ मार्च २०२० पासून देशामध्ये व्यापक निर्बंध लावले याचा फटका अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांना कमी अधिक प्रमाणात बसला. लॉकडाऊनच्या काळात अनेक छोटे—मोठे उद्योग व व्यवसाय बंद होते परिणामतः अर्थव्यवस्थेत उत्पादनातील घट कमालीची वाढून आर्थिक वृध्दीदर घटला, मोठया प्रमाणात बेरोजगारी वाढली कधी नव्हे तो भारतामध्ये बेरोजगारीचा दर १३ टक्यापर्यंत वाढलेला होता. नंतरच्या काळात निर्बंधात हळुहळु सुट मिळाल्यामुळे अर्थव्यवस्थेचे चक्र सुरू झाले आणि अर्थव्यवस्थेची वाटचाल सकारात्मकतेच्या दिशेने सुरू झाली. भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने समोर येणारा काळ खुप आव्हाणात्मक व महत्वाचा असणार आहे. सरकारला अर्थव्यवस्थेची गती आणि विकास या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. बिघडलेले अर्थचक्र वाढलेली बेरोजगारी आणि पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या दरवाढीमुळे वाढलेली महागाई या आव्हाणांचा सामना करून अर्थव्यवस्थेला रूळावर आणण्याचे काम करावे लागणार आहे. अर्थव्यवस्थेचे चक्र गतिमान करण्यासाठी ठोस निर्णय घ्यावे लागणार आहे. अर्थव्यवस्थेमध्ये सद्या असणारी मरगळ दुर करून जागतिक स्तरावर वेगाने आर्थिक विकास साध्य करणारा देश म्हणून भारताची ओळख निर्माण करावी लागणार आहे. यासाठी अर्थव्यवस्थेमध्ये अनुकूल धोरणांची निर्मिती करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी लागेल.

गरीबी निमुर्लनासाठी सर्वसमावेशक आणि शाश्वत विकास आणि उत्पन्नाच्या समतोल संधी आवश्यक आहेत. शिक्षण, आरोग्य आणि दरडोई उत्पन्न वाढविण्याच्या विविध योजनांची अंमलबजावणी करून अधिकाअधिक नागरीकांना समान संधी उपलब्ध करून देणे दारीद्र्य निमुर्लनासाठी आवश्यक आहे.

संदर्भ सूची
१) प्रा. एन. एल. चव्हाण :भारतीय अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन,पुणे.
२) डॉ. सुभाश गंगवाल :भारत का विकास, मंगलदिप पब्लिकेशन जयपुर
३) सी. प. खेर दारिद्र्याची संकल्पना आणि निवारण :दिलीपराज प्रकाधन प्रा.ली. पुणे
४) श्री. रंजन कोळंबे :भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पुणे
५) प्रा. शरद शंकर जोशी :भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन, पुणे
६) प्रा. जगत कराडे :जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने ,डायमंड पब्लिकेशन, पुणे
७)AVision for 21 Century :B. Mishra G.C.Kar
8) Economic Development Planning and Policy :-R.K.Mishra V.K.Puri
9) Rural Development – Katar Singh:Sage Publication
10) www.google.com
११) दैनिक : लोकमत, सकाळ, नागपूर टाइम्स